
माघ शु. ५, युगाब्द ५१०३ दि. १७ फेब्रुवारी २००२ / १५ रुपये

साप्ताहिक
# विवेक

भगवान महावीर २६०० वी जयंती महोत्सवानिमित्त




# जैन विशेषांक



# भगवान ऋषभदेवांची कृषी संस्कृती अनुसरली !

**कृषी उद्योगात जागतिक स्तरावर अग्रपूजेचा मान प्राप्त करणारे जैन उद्योगसमूहाचे संस्थापक-अध्यक्ष भवरलालजी जैन शेतकऱ्यांना मात्र आजही आपले भाऊच वाटतात. कृषी उद्योगात आर्थिक उपलब्धीपेक्षा जीवनाची दिशा शोधणारे आणि आपल्या या क्षेत्रातील वाटचालीचे श्रेय जैनधर्मीय परंपरेला देणारे भवरलालजी खऱ्या अर्थाने 'तुलसीपत्र' आहेत. तराजूच्या एका पारड्यात सर्व प्रकारची भौतिक संपत्ती टाकली आणि दुसऱ्यात त्यांचे व्यक्तिगत जीवन तोलले तर ते पारडेच खाली जाईल. जैन विशेषांकाच्या निमित्ताने त्यांच्याशी विवेकचे कार्यकारी संपादक आबासाहेब पटवारी यांनी केलेल्या चर्चेचा काही अंश –**




दु:ख, दैन्य अन् दारिद्र्यातील शेतकरी माझा
जुन्या पुराण्या शेती मधला रुतलेला फासा ॥
आम्ही सोडवू फासा रुजवून थेंबाचे पाणी
थेंबाचे पाणी नवे आकाश पांघरोनी ॥

**जैन धर्माचा विचार आणि त्यानुसार आचरण याबद्दल आपले काय अभिमत आहे ?**

अद्वैत वाद हा जैन धर्माचा आधारस्तंभ आहे. बदलत्या काळात आपण धर्माचे रीतीरिवाज, आचारपद्धती जरी पाळू शकलो नाही तरी त्याची मूलभूत तत्त्वप्रणाली (core philosophy) जी आहे ती तरी आपण सांभाळलीच पाहिजे. अगदी मंदिरांची जरी गोष्ट घेतली तरी त्याला कालमर्यादा असू शकतात, परंतु धर्म या संकल्पनेला आयुष्य नाही. माझा विश्वास जेवढा धर्मावर आहे तेवढा त्याच्या बाह्यांगावर नाही. तुम्ही जर मला विचाराल की मी धार्मिक आहे का? तर मी म्हणेन की मी स्वत:ला धार्मिक मानत नाही. पण असे जर विचाराल की ईश्वरावर विश्वास आहे का नाही ? तर तो निश्चितपणे आहे. आणि मी कदाचित चुकत असेन, परंतु त्याला शोधण्यासाठी मंदिरातच जाण्याची गरज आहे असे नाही. तो कुठेतरी माझ्यातच आहे. आणि म्हणून आपल्याला तो जसा अभिप्रेत असेल तसं वागायचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

**आपण जे जैन धर्माच्या मूलभूत (Core values) संकल्पनांबद्दल बोललात त्या जरा स्पष्ट करून सांगाल का ?**

जैन धर्माच्या कोअर व्हॅल्यूज म्हणजे प्रथमत: अहिंसा, 'या जगात जे जे हिंसेच्या विरुद्ध आहे ते अहिंसा' अशा पारंपरिक अर्थाने या शब्दाकडे पाहता कामा नये. अहिंसा हा मूळ शब्द-संकल्पना मानली पाहिजे आणि तिच्याविरुद्ध ती हिंसा. सकारात्मक अर्थाने तो शब्द घेतला पाहिजे. अहिंसा ही जर मूलभूत संकल्पना मानली नाही तर निसर्ग जसा निर्माण झाला, राहतो, वागतो आणि वाढतो ही 'order'च नाकारली तर सारी सुसूत्रताच नष्ट होईल. सगळी व्यवस्थाच कोलमडेल. केवळ निसर्गाचीच नाही, तर जगाची देखील.



'मनुष्य जन्माने नाही केवळ कर्मानेच महान होतो.'' या भगवान महावीरांच्या उक्तीचा जीवंत आदर्श म्हणजे भवरलाल जैन, जैन इरिगेशन सिस्टम्स लि., चे संस्थापक अध्यक्ष.

म्हणून अहिंसा हे मध्यवर्ती मूल्य (Central value) आहे आणि तिच्या सभोवती अद्वैत अनेकान्तवाद इत्यादींचे वलय आहे. तुमच्याकडे शाश्वत सत्य आहे आणि माझ्याकडे जर ते आहे तर मी विरोध कोणत्या आधारावर करू शकेन? अहिंसेचा हा मूलभूत विचार आहे. निसर्गनियमांचे परिपालन करणे, त्याचा समतोल सांभाळणे ही अहिंसा आहे. हा समतोल बिघडला तर मानवी जीवनावर देखील वाईट परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. असे जेव्हा घडले तेव्हा निसर्ग आहे तसाच राहिला, पण मानवजातीलाच त्याचे दुःखद परिणाम भोगावे लागले. निसर्गाने अहिंसा जपली आहे, नव्हे ती साऱ्या विश्वातच जर आहे तर या विश्वाचा छोटासा भाग असलेल्या मानवजातीने तरी तिचे पालन का करू नये ? अहिंसा हेच वास्तव आहे. हिंसा हा अपवाद आहे.

**आपल्या कृषीउद्योगाच्या संकल्पनेशी हा विचार कुठे जोडता येईल का ?**

मला तसे वाटते. कृषी हा उत्तम मार्ग म्हणून समजला गेला आहे. अगदी जैन तत्त्वज्ञानाच्या सुरुवातीपासून त्याला मान्यता आहे. ऋषभदेवांनी प्रथम कृषीची संकल्पना अमलात आणल्याचे मानले जाते. त्यांनी मानवाला प्रथम शेती करायला शिकवले, आणि जैन धर्मीयांचे कृषी क्षेत्राशी निकटचे नाते जुळलेले आहे. जैन माणूस इथे आला तो अगदी सुदूरच्या खेड्यापर्यंत पोहोचला. असे म्हणतात की *जहाँ न जाये बैलगाडी वहाँ पहुँचा मारवाडी.* जिथे जिथे तो गेला तिथे तिथे तो कृषी क्षेत्राशी निगडीत राहिला. शेतकऱ्याची आर्थिक नड त्याने भागवली. थोडा पैसा जमा होताच त्याने शेत विकत घेतले व शेतकरी झाला किंवा शेतमालाचा, अन्नधान्याचा व्यापार करू लागला. ऋषभदेवांनी दिलेली कृषीसंस्कृती जैनांनी स्वीकारली आहे. कालमानाप्रमाणे चढउतार जरूर झाले असतील, पण ते वास्तव आहे आणि तेच मी स्वीकारले आहे. मी काही विशेष केले आहे असे नाही. ऋषभदेवांनी शिकवलेला मार्गच मी अनुसरत आहे आणि सुदैवाने माझ्या अगदी कमी शिकलेल्या पण सुशिक्षित आईनेदेखील त्याला दुजोरा दिला आहे. मला वाटते अहिंसेमधूनच निसर्ग, अहिंसेमधूनच शेती आणि शेती उद्योगाचा विचार माझ्यापर्यंत आला आहे, तो योगायोग आहे असे म्हणण्यापेक्षा तो ऋषभदेवांचा वारसा मी चालवला आहे असे मला वाटते.

**आपण ही कृषी उद्योगाची एक मोठी संकल्पना अंगीकारली आहे आणि जी जैन धर्माशी सुसंगत आहे, तरीदेखील जैन धर्मीयांमधे ती अगदी अल्पांशाने अवतरलेली आढळते. ती प्रभावी होण्यासाठी काय करावे लागेल?**

हा सोपा मार्ग नाही. जैन धर्मही सोपा मार्ग नाही. आणि म्हणूनच तो पसरलेला नाही. आचाराला कठीण आहे, विचाराला सुद्धा कठीण आहे. आचार म्हणजे एका तपस्याच आहे आणि तपस्येमधून ईश्वरप्राप्ती ही जैन दर्शनाने प्रथम प्रतिपादन केली. भक्तीचा सोपा मार्ग प्रतिपादन केला गेला, परंतु तिच्या माध्यमातून गैर गोष्टी प्राप्त केल्याची उदाहरणे कमी नाहीत. जैन धर्माला तप अभिप्रेत आहे. जैन धर्माने स्त्रीलादेखील बरोबरीचे स्थान दिले. तीर्थंकरपददेखील दिले.



आतापर्यंत जैन इरिगेशनला २५ राज्यांतर्गत आणि ६० राष्ट्रीय पातळीवर पारितोषिके मिळाली आहेत. असाधारण निर्यात प्रयत्न, संशोधन आणि विकास कार्यक्रमातील यश तसेच उद्योजकतेबद्दल ही पारितोषिके मिळालेली आहेत. जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष मा. श्री. भवरलाल जैन यांना व्यक्तिश: सिंचन क्षेत्रातील त्यांनी केलेल्या अमेरिकेबाहेरील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल 'दि क्रॉफर्ड रीड मेमोरियल' या जागतिक इरिगेशन असोसिएशनचे आंतरराष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे. १८ वर्षात फक्त १२ व्यक्तींना हा गौरव प्राप्त झाला असून हा सन्मान मिळविणारे ते एकमेव भारतीय असून संपूर्ण आशिया खंडातील दुसरी व्यक्ती आहेत.

कृषी उद्योग हा एका अर्थाने वेगळ्या प्रकारचा उद्योग आहे. इथे केवळ आर्थिक नफ्याची संकल्पना नाही. ज्याला निर्मितीचा आनंद मिळवायचा आहे, त्यालाच या उद्योगात रमता येईल. त्यामुळे अभावानेच लोक याकडे वळतात. आपण दीपस्तंभ व्हायचं की जहाज व्हायचं हे ठरवायला पाहिजे. मार्ग दाखवणे आपले काम असावे.

## आईचे प्रशस्तीपत्र मोलाचे !

कृषी उद्योगाचा मी अनुसरलेला मार्ग योग्य आहे याचे सर्वश्रेष्ठ प्रमाणपत्र मला माझ्या आईकडून मिळाले आहे. तो किस्साच ऐकण्यासारखा आहे. दूरदर्शनची यशस्वी उद्योजकाच्या आईची मुलाखत प्रक्षेपित करण्याची योजना होती. आमच्या एका मित्राने मोठ्या कष्टाने तिला बोलते केले. मुलाखतीच्या वेळी मी तिथे नव्हतो आणि नंतर मी ती पाहिली देखील नव्हती. परंतु आईच्या निधनानंतरच्या बारा दिवसांच्या काळात मी ती ऐकली आणि त्या दु:खाच्या दिवसातही आईने मला दिलेले प्रशस्तीपत्र ऐकून धन्यता वाटली.

तिला प्रश्न असा विचारला होता की, भाऊंनी (भवरलाल जैन) कृषी उद्योगापेक्षा कमी कष्टाचा एखादा उद्योग उभारला असता तरी त्यांना अधिक नफा मिळवता आला असता, (प्रश्नकर्त्याचा रोख मला येऊन गेलेले हृदयविकाराचे झटके आणि दोनदा झालेल्या बायपास सर्जरी यानंतरही मी करीत असलेले दिवसाचे सोळा तास काम याकडे असावा.) त्यावर आईने दिलेले उत्तर असे होते.

''होय, नफा मिळाला असता, जास्त लोकांना नोकऱ्या दिल्या असत्या, कुटुंबही अधिक श्रीमंत झाले असते. पण माणसाबरोबर पशुपक्षी, निसर्ग यांचीही काळजी घेण्याची जबाबदारी देवाने माणसांवरच सोपवली आहे ना ! भाऊ तेच काम करतो आहे आणि तेच योग्य आहे !

**दहशतवादाचा उगम कशात आहे असे आपणास वाटते?**

जैन धर्मामध्ये अपरिग्रहावर भर दिला आहे. अपरिग्रह आपण विसरलो आणि पैशाचा अतिरेक स्वीकारला. मागील तीन शतके विज्ञान आणि तंत्रज्ञान यावर भर दिला गेला, पण त्याचबरोबर धार्मिकता (Spirituality) आवश्यक आहे हे विसरले गेले. त्यामुळे पाश्चिमात्त्यांमध्ये एक प्रकारची पोकळी निर्माण झाली. तसेच काही देशांना सहजपणे पैशाचा जो अमाप लाभ झाला त्यामुळे देखील या भावनेला संबंधित लोक दुरावले. शारीरिक सुखाच्या अतिरेकात आनंदाचा लोप झाला. त्यामुळे ही प्रवृत्ती वाढत गेली. परंतु नैसर्गिक घडण जर आवश्यक असेल तर त्यांना धार्मिकता स्वीकारावीच लागेल.

**आपल्याला या निमित्ताने तरुणांना काय संदेश द्यावासा वाटतो?**

साधन आणि साध्य यांचा योग्य समतोल सांभाळणे आवश्यक आहे. आमच्या तरुणांना मला मुद्दाम सांगावेसे वाटते की तुम्ही निसर्गाचे नियम समजून घ्या. कोणत्याही गोष्टीला नैसर्गिक मर्यादा असतात. त्या भंग करून चालत नाही. निसर्गाचे एक ठरावीक चक्र आहे, ते पाळले जाते. घाई करून योग्य फळ मिळत नाही. तसेच योग्य कालावधी व नियमन आवश्यक आहे. तरुणांनी दिशाहीन होऊ नये. प्रथम आपल्या जाण्याची दिशा निश्चित केली पाहिजे. त्यानंतर आपले लक्ष्य निश्चित केले पाहिजे. गंतव्यस्थान आणि दिशा निश्चित असेल तर आपण ठरावीक ठिकाणी निश्चित पोहोचू शकाल. वेळ लागला तरी चालेल. आवश्यक तेवढा संयम पाळणे आवश्यक आहे. या गोष्टी सांभाळल्या तर आपल्या समाजातील तरुणांची योग्य दिशेने वाटचाल होईल असा मला विश्वास वाटतो.

❖❖❖

*जहाँ विश्वास ही परंपरा है*
श्री पारस
प्रोव्हीजन ॲण्ड जनरल स्टोअर्स
स्वादिष्ट मसाले, उत्कृष्ट सुकामेवा व निवडक किराणा माल मिळण्याचे विश्वासपात्र ठिकाण
पारस कम्पाऊंड, सोयगांव, ता. मालेगाव ✆ ४२६०५१/५२
आमची कोठेही शाखा नाही

*With Best Compliments From*
***Mahavir Stationers***
*Supplier of*
*All Type of Stationery & Computer Materials*
**Prop.: Bharat Shah**
*Opp. Jain Temple, Tilak Road, Malegaon-423 203, (Dist. Nashik)*
*Phone : (0255) 431 799*

हार्दिक शुभेच्छा!
**राजाभाऊ छाजेड**
शिवसेना मनमाड शहरप्रमुख
संस्थापक, साईबाबा मंदिर, अनकवाडे
संस्थापक, जयभवानी पुस्तक पतपेढी
डॉ. आंबेडकर रोड, मनमाड - ४२३ १०४.
दूरध्वनी : नि. २३५७१ ऑ. २४२९५